आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
३१ जानेवारी २०२६ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री म्हणून सुनेत्रा पवार यांचा शपथविधी, उत्पादन शुल्क, क्रीडा खात्याचा पदभार

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याकडून सुनेत्रा पवार यांचं अभिनंदन, शपथविधीच्या घाईबद्दल काँग्रेसकडून सवाल उपस्थित

- केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन उद्या सकाळी ११ वाजता अर्थसंकल्प सादर करणार

- इस्त्राईलन पॅलेस्टिनवर केलेल्या हल्ल्यात २३ नागरिक ठार

आणि

- ऑस्ट्रेलियन खुल्या टेनिस स्पर्धेच्या महिला एकेरीत कझाकस्तानची एलेना रिबाकीना अजिंक्य

**<><><><><>**

सुनेत्रा अजित पवार यांनी आज महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. लोकभवनातल्या दरबार हाॅल सभागृहातल्या छोटेखानी कार्यक्रमात राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी सुनेत्रा पवार यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. यामुळं सुनेत्रा पवार या राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री ठरल्या आहेत. याप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह राज्य मंत्रिमंडळातले मंत्री, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते उपस्थित होते. त्यांच्याकडे उत्पादन शुल्क, क्रीडा, युवक कल्याण, अल्पसंख्यक विकास आणि औकाफ ही खाती सोपवण्यात आली आहेत.

तत्पूर्वी सुनेत्रा पवार यांनी आपल्या राज्यसभा सदस्यत्वाचा राजीनामा उपराष्ट्रपती सी.पी.राधाकृष्णन यांच्याकडे पाठवला. त्यानंतर, मुंबईतल्या विधानभवनात राष्ट्रवादी काँग्रेसच्या विधीमंडळ पक्षाची बैठक पार पडली. या बैठकीत सुनेत्रा पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस विधिमंडळ पक्षाच्या नेते पदी निवड करण्यात आली. तसेच पक्षाबाबतचे निर्णय घेण्याचे सर्वाधिकारही त्यांच्याकडे सोपविण्यात आले. विधानभवनातल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदारांच्या बैठकीत एकमताने हा निर्णय झाला. या बैठकीनंतर तातडीने

राष्ट्रवादी काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्यांनी वर्षा निवासस्थान गाठत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेत पक्षाने केलेल्या ठरावाची माहिती दिली. त्यानुसार सुनेत्रा पवार यांचा उपमुख्यमंत्रीपदी नियुक्तीचा मार्ग मोकळा झाला होता.

**<><><><><>**

आदरणीय अजित पवार यांनी आयुष्यभर शेतकरी, कष्टकरी, महिला, युवक आणि वंचित घटकांसाठी जगण्याचा मंत्र दिला. आज त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेत ‘शिव-शाहू-फुले-आंबेडकर’ यांच्या विचारांवर निष्ठा ठेवून कर्तव्य भावनेनं उपमुख्यमंत्री पदाची जबाबदारी स्वीकारताना मन अक्षरशः भरून येत असल्याची प्रतिक्रिया सुनेत्रा पवार यांनी दिली आहे. त्यांच्या अकाली जाण्यानं मनावर दुःखाचा मोठा डोंगर कोसळला असला, तरी अजित पवार यांनी शिकवलेली कर्तव्यनिष्ठा, संघर्षाची ताकद आणि जनतेप्रतीची बांधिलकी हाच माझा खरा आधार आहे, असं त्यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सुनेत्रा पवार यांना शुभेच्छा दिल्या आहेत. राज्यातल्या जनतेच्या कल्याणासाठी त्या अथक परिश्रम करतील आणि अजित पवार यांचं स्वप्न त्या पूर्ण करतील, अशी प्रतिक्रिया प्रधानमंत्र्यांनी दिली आहे. राज्याचे हित लक्षात घेऊन अतिशय कठिण परिस्थितीत सुनेत्रा पवार खंबीरपणे जबाबदारी स्वीकारत आहेत, हे कौतुकास्पद असल्याचं केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी म्हटलं आहे.

धीरोदात्तपणे सुनेत्रा पवार यांनी घेतलेला निर्णय कौतुकास्पद, धाडसी आणि त्यांची प्रतिबद्धता अधोरेखित करणारा आहे, अशी शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे. अजित पवार यांचा वारसा त्या समर्थपणे चालवतील आणि त्यांची ही कारकीर्द यशस्वी ठरेल असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार फौजिया खान यांनी सुनेत्रा पवार यांना शुभेच्छा दिल्या आहेत. उपमुख्यमंत्री म्हणून त्या उत्तम कारभार करतील, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली आहे. आमदार रोहित पवार यांनीही सुनेत्रा पवार यांच्या शपथविधी बद्दल आनंद व्यक्त केला आहे.

सुनेत्रा पवार यांच्या शपथविधीवर काँग्रेसनं काही सवाल उपस्थित केले आहेत. सरकारकडे एवढं बहुमत असताना अशाप्रकारची घाई अनाकलनीय असल्याचं काँग्रेस

प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले. तर राष्ट्रपती, प्रधानमंत्री, मुख्यमंत्री यासारखं उपमुख्यमंत्री हे घटनात्मक पद नसताना एवढ्या घाईत शपथविधी का झाला हे राष्ट्रवादी काँग्रेसचं सांगू शकते असं काँग्रेस प्रवक्ते अतुल लोंढे म्हणाले.

<><><><><>

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन उद्या सकाळी ११ वाजता लोकसभेत अर्थसंकल्प सादर करणार आहेत. हा त्यांचा विक्रमी सलग नववा अर्थसंकल्प आहे. एकाच प्रधानमंत्र्यांच्या नेतृत्त्वाखालील सरकारमध्ये त्यांनी हे अर्थसंकल्प सादर केले आहेत.

यापूर्वी प्रधानमंत्री म्हणून मोरारजी देसाई यांनी एकूण १० अर्थसंकल्प सादर केले आहेत. पण ते सलग नव्हते. पी. चिदंबरम यांनी ९ तर प्रणव मुखर्जी यांनी ८ अर्थसंकल्प मांडले आहेत. पण त्यावेळी प्रधानमंत्री वेगवेगळे होते.

अर्थसंकल्प असल्यानं देशातल्या शेअर बाजारात उद्या नियमित वेळेनुसार व्यवहार होणार आहेत. अर्थसंकल्पानिमित्त उद्या आकाशवाणीवर आपल्याला विविध चर्चात्मक कार्यक्रम आणि अर्थसंकल्पाचं विश्लेषण ऐकता येईल. आकाशवाणीच्या मुंबई केंद्रावरुन प्रसारित होणाऱ्या दुपारच्या राष्ट्रीय बातम्या दुपारी १ वाजून ५० मिनिटांनी प्रसारित केल्या जाणार आहेत.

<><><><><>

बँकांमधल्या ठेवी आणि शेअरबाजारातल्या गुंतवणुकीवर मिळणाऱ्या परताव्यावर समान कर आकारण्यात यावा अशी अपेक्षा स्टेट बँकेचे अध्यक्ष सी एस सेट्टी यांनी व्यक्त केली आहे. सध्या बँकेतल्या ठेवींवर करदात्याच्या एकूण मिळकतीनुसार सुमारे ३० टक्केपर्यंत कर आकारला जाऊ शकतो. तर समभागातल्या दीर्घ मुदतीच्या गुंतवणुकीच्या परताव्यावर साडेबारा टक्के पर्यंत कर आकारला जातो.

देशातल्या उदयोन्मुख उद्योगांना वित्तपुरवठ्याकरता स्टेट बँकेनं सुरु केलेल्या चक्र या नवीन उपक्रमाचं उद्घाटन मुंबईत सेट्टी यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि त्यांच्या इस्रायल दौऱ्याचा संदर्भ देणारा एपस्टीन फाइलींचा कथित ई-मेल संदेश परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं फेटाळला आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी जुलै २०१७ मध्ये इस्रायलचा अधिकृत दौरा केला होता, मात्र ई-मेलमधील

अन्य दावे या एका दोषी गुन्हेगाराच्या तथ्यहिन कल्पना आहेत, असं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे प्रवक्ता रणधीर जैसवाल यांनी निवेदनाद्वारे स्पष्ट केलं.

**<><><><><>**

अरब देशांच्या परराष्ट्रव्यवहार मंत्र्यांच्या शिष्टमंडळाने आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची भेट घेतली.

गाझा पट्टीत शांतिस्थापनेच्या प्रयत्नांना दाद देत, पॅलेस्टीनच्या नागरिकांना भारताचा कायम पाठिंबा राहील अशी ग्वाही प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी यावेळी दिली. अरब देशांबरोबर भारताचे संबंध कसे राहतील याबाबतचा आराखडा मोदी यांनी या बैठकीत सादर केला. व्यापार, गुंतवणूक, उर्जा, तंत्रज्ञान, आरोग्य,आणि इतर क्षेत्रात उभयपक्षी सहाकार्य वाढवण्यासाठी भारत वचनबद्ध आहे, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

दहशतवादाबाबात शून्य सहिष्णुता  या मुद्द्यावर तडजोड होता कामा नये अशीच साऱ्या जगाची भूमिका असावी असं आवाहन परराष्ट्र मंत्री डॉ. एस जयशंकर यांनी केलं आहे. भारत आणि अरब देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांची दुसरी बैठक नवी दिल्लीत आज सुरु झाली. दहशतवादाच्या राक्षसाचा मुकाबला करण्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर सहकार्याची गरज आहे, त्यांनी उद्घाटनपर भाषणात व्यक्त केली. गाझा पट्टीत शांतता प्रस्थापित करण्यासाठी सर्वसमावेशक कार्यक्रम आवश्यक आहे. सुदान, यमन, लेबनान, सीरिया आणि लिबियातही  शांतता प्रस्थापित केली पाहिजे यावर त्यांनी भर दिला.

**<><><><><>**

इस्राईलने आज पॅलेस्टिनवर केलेल्या हल्ल्यात किमान २३ नागरिक ठार झाल्याचं गाझामधल्या रुग्णालयांनी सांगितलं. ऑक्टोबरमध्ये झालेल्या युद्धबंदीनंतर झालेल्या हल्ल्यात सर्वाधिक नागरिकांचा मृत्यू झाला आहे. इस्रायलनं काल हमासवर युद्धबंदीचं उल्लंघन केल्याचा आरोप करत आज हा हल्ला केला.

**<><><><><>**

भारत आणि न्यूझीलंड दरम्यान ट्वेंटी ट्वेंटी क्रिकेट मालिकेतला पाचवा आणि अंतिम सामना आज तिरुवनंतपुरममध्ये सुरू आहे. नाणेफेक जिंकून भारतानं या फलंदाजीचा निर्णय घेतला आहे. पण भारताची सुरुवात खराब झाली. संजू सॅमसन ६ तर

अभिषेक शर्मा ३० धावांवर बाद झाला. इशांत किशन आणि सूर्यकुमार यादव यांनी भारताचा डाव सावरला.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारताच्या १५ षटकात ३ बाद १८७ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

ऑस्ट्रेलियन खुल्या टेनिस स्पर्धेच्या महिला एकेरीत कझाकस्तानच्या एलेना रिबाकीना हिनं अजिंक्यपदावर नाव कोरलं. आज झालेल्या अटीतटीच्या अंतिम सामन्यात तिनं अरीना साबालेंका हिच्यावर ६-४, ४-६, ६-४ अशी मात केली.

क्रिस्टियन हॅरिसन आणि नील स्कूपस्की यांनी जेसन कुबलर आणि मार्क पोलमान्स यांच्यावर थेट सेट्समध्ये मात करून पुरुष दुहेरीचा मुकुट पटकावला.

महिला दुहेरीचं जेतेपद झांग शुआई आणि एलीजे मर्टन्स यांनी मिळवलं. त्यांनी ॲना डॅनिलिना आणि अलेक्झांड्रा क्रुनिक या जोडीवर सहज मात केली.

मिश्र दुहेरीत ऑलीव्हिया गॅदेकी आणि जॉन पिअर्स या जोडीनं मॅन्युएल गुइनार्ड आणि क्रिस्टीना म्लादेनोविच यांच्यावर मात करून जेतेपदाला गवसणी घातली.

पुरुष एकेरीचा अंतिम सामना उद्या अग्रमानांकित, स्पेनचा कार्लोस अल्काराज आणि सर्बियाचा नोव्हाक ज्योकोविच यांच्यात रंगणार आहे.

**<><><><><>**

वक्फ मालमत्तांचे व्यवस्थापन पारदर्शक, लोकस्नेही आणि जबाबदार करण्यासाठी सरकारने उमीद संकेतस्थळावर सर्वेक्षण मॉड्यूल आणि वक्फ मालमत्ता भाडेपट्टा मॉड्यूल अल्पसंख्याक व्यवहार मंत्रालयाने सुरू केलं आहे. या बाबत आज मंत्रालयाने ही माहिती दिली.

**//<><><><><>//**